| | | | |
|---|---|---|---|
| CNR No.MHWS040004872022 | दाखल तारीख | : | ०५/०३/२०२२ |
| | नोंदणी तारीख | : | ०५/०३/२०२२ |
| | निकाल तारीख | : | ३०/०७/२०२६ |
| | कालावधी | : | ०४ वर्ष ०४ म २५ दि |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरुळपीर, जि. वाशिम यांचे न्यायालयात**
**(पिठासिन अधिकारी सुभाष द. तारे)**

**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.०६/२०२२** **निशाणी क्र.३४**

१) **सौ.रुपाली वैभव जाधव,**
वय:- २४ वर्षे, धंदा:-घरकाम

२) **आदीत्य वैभव जाधव,**
वय:- ०३ वर्षे,

(अर्जदार क्र.०२ अज्ञान तर्फे
पालनकर्ती आई अर्जदार क्र.०१)
रा. १ द्वारा रा.अशोकराव श्रीरामजी माने
रा.शेलुबाजार, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम
रा. २ कनका, ता. जि. हिंगोली. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

१) **वैभव बापूराव जाधव,**
वय :- २७ वर्षे, धंदा :- शेती व ऑटो चालक

२) **बापूराव नारायण जाधव,**
वय :- ५० वर्षे, धंदा :- शेती व दुध डेअरी

३) **सौ.सरोजा बापूराव जाधव,**
वय :- ४५ वर्षे, धंदा :- शेती व मजुरी

४) **सौ.वनिता सतीश काटकर,**
वय :- ३५ वर्षे, धंदा :- घरकाम

५) **सतीश कोडींबा काटकर,**
वय :- ३८ वर्षे, धंदा :- शेती

६) **सौ.कल्पना निळकंठ शेळके,**
वय :- ३३ वर्षे, धंदा :- घरकाम

७) **निळकंठ अंनतराव शेळके,**
वय :- ३७ वर्षे, धंदा :- नोकरी

८) **महादेव बापूराव जाधव,**
वय :- २१ वर्षे, धंदा :- शेती

९) **सौ.अन्नपूर्णा रामचंद्र काटकर**,
वय :- ४७ वर्षे, धंदा :- घरकाम

१०) **रमेश रामचंद्र काटकर**,
वय :- ३२ वर्षे, धंदा :- शेती व मजुरी

११) **सौ.मालुबाई रमेश काटकर**,
वय :- ३० वर्षे, धंदा :- घरकाम

१२) **कोंडबा बाबाराव काटकर**,
वय :- ५५ वर्षे, धंदा :- शेती व मजुरी

१३) **प्रकाश नारायण जाधव**,
वय :- ४५ वर्षे, धंदा :- शेती व मजुरी

१४) **राजु प्रकाश जाधव**,
वय :- २७ वर्षे, धंदा :- शेती व मजुरी

१५) **सौ.रेखा राजु जाधव**,
वय :- २५ वर्षे, धंदा :- घरकाम

१६) **गजानन हरीभाउ जाधव**,
वय :- वर्षे, धंदा :- शेती व मजुरी

१७) **भिकाजी चव्हाण**,
वय :- ५८ वर्षे, धंदा :- शेती व मजुरी

१८) **विष्णु सावंत**,
वय :- ४९ वर्षे, धंदा :- शेती व मजुरी

१९) **सौ.शिला शिवाजी पवार**,
वय :- ४९ वर्षे, धंदा :- घरकाम

अ.क्र.१ ते ५ व ८ ते १६ रा.कनका, ता. जि. हिंगोली.
अ.क्र.६ व ७ रा. माणरुतकला, ता. हकणार,
जि. बुरानपुर, (एम.पी.) मध्यप्रदेश
अ.क्र.१७ ते १९ रा.वाल्पीसाल्पी, ता. बार्शिटाकळी,
जि. अकोला .....**सामनेवाला**

---

**प्रकरण : महिलांवरील कौटुंबीक हिंसाचार प्रतिबंधक अधिनियम २००५ चे कलम १२ अन्वये अर्ज.**

---

अर्जदारांतर्फे विधिज्ञ :- श्री. एस. व्ही. गटटाणी.
सामनेवालातर्फे विधिज्ञ :- श्री. एम. डि. वरघट

---

## न्यायनिर्णय
## (घोषित दिनांक ३०/०७/२०२६)

**१.** अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज महिलांचे कौटुंबीक हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियम २००५ कलम १२ अन्वये कलम १८, १९, २० व २२ खालील मदत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**अर्जदारांची थोडक्यात हकिगत अशी की,**

**२.** अर्जदार क्र.०१ हिचा विवाह सामनेवाला क्र.०१ याच्यासोबत दिनांक ०६/०५/२०१५ रोजी मौजे शेलुबाजार, ता. मंगरुळपीर, जि वाशिम येथे झाला. लग्नामध्ये तिच्या वडिलांनी २,००,०००/- रुपये खर्च केला होता व १,५०,०००/- रुपये हुंडा दिला होता. तसेच अर्जदार क्र.१ हिस सोन्याचे मंगळसूत्र, कानातील रिंग, चांदीचे जोडवे व इतर दागिणे दिले होते आणि आंदण म्हणुन फ्रिज, कुलर, सोफासेट, टिव्ही, मिक्सर, खुर्ची व इतर भांडे दिले होते. सामनेवाला क्र.२ हे अर्जदार क्र.१ हिचे सासरे आहेत, सामनेवाला क्र.३ ही सासु आहे, सामनेवाला क्र.४ व ६ या ननंदा आहेत, सामनेवाला क्र.५ व ७ हे नंदोई आहेत, सामनेवाला क्र.८ हा दिर आहे, सामनेवाला क्र. ९ व ११ मामे सासु आहेत, सामनेवाला क्र.१० मामे सासरे आहेत, सामनेवाला क्र.१३ ते १६ हे चुलत सासरे, चुलत भासरा, चुलत जाउ आहेत, सामनेवाला क्र.१७ ते १९ हे मावस सासरे व मावस सासु आहेत.

**३.** लग्नानंतर सामनेवाला यांनी अर्जदार क्र.१ हिस ४ महिने चांगले नांदविले. त्यानंतर तिला लहान कारणावरुन शारीरिक व मानसिक त्रास देत असत, शिळे व उष्टे अन्न खायला देत असत. सामनेवाला क्र.२ ते ८ यांच्या चिथावणीवरुन सामनेवाला क्र.१ हा तिला मारहाण करत असे. तिला मुल होत नाही या कारणावरुन सामनेवाला क्र.१ ते ५ व ८ यांनी जास्त त्रास देणे सुरु केले. शेतीच्या पेरणीकरीता सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिस माहेरुन रक्कम रुपये ३०,०००/- आणण्यास सांगितले

होते, त्यावेळी तिच्या वडिलांनी तिच्या समक्ष रोख रक्कम रुपये ३०,०००/- दिले होते. त्यानंतर तिला काही दिवस चांगले नांदविले. सामनेवाला क्र. १ यास भरपूर हुंडा देणारी बायको करुन देतो, तु फारकत दे असे सामनेवाला क्र.२ ते ५ म्हणत असत व त्यांच्या चिथावणी वरुन सामनेवाला क्र.१ हा तिला मारहाण करत असे. सामनेवाला क्र.७ व ८ हे तिच्याकडे अश्लिल नजरेने पाहत असत. तिच्या मुलासाठी ५,००,०००/- रुपये देणारी गोरी बायको सामनेवाला क्र.९ देण्यास तयार असुन लवकर फारकत देण्याची मागणी सामनेवाला क्र.३ करत असे. सामनेवाला क्र.९ ते १२ हे त्यांच्या नात्यातील मुली सामनेवाला क्र.१ व ३ यांना दाखवत असत. सामनेवाला क्र.१, ३ व ४ हे अर्जदार क्र.१ हिस इतरांशी बोलु देत नसत व मोलकरीन सारखी वागणुक देत असत.

४. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, सामनेवाला क्र.१० हा शिवसेनेचा माजी सभापती असल्याचे सांगुन अर्जदार क्र.१ पेक्षा चांगली ५,००,०००/- रुपये हुंडा देणारी मुलगी आणुन देतो असे म्हणत असे व त्याच्या सांगण्यावरुन सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिस मारहाण करत असे. सामनेवाला क्र.१३ ते १९ हे सामनेवाला क्र.१ व ३ यांना अर्जदार क्र.१ च्या विरुध्द वाईट बोलत असत. सामनेवाला क्र.१३ ते १९ यांनी अर्जदार क्र.१ हिस जिवाने मारण्याकरीता तिच्या जेवणामध्ये विष देण्याचा प्रयत्न केला होता, परंतु सर्व चांगले होईल या अपेक्षेने तिने तक्रार केली नाही. अर्जदार क्र.२ याच्या जन्मानंतर सामनेवाला क्र.१ याच्या व्यतिरिक्त कोणीही बघण्याकरीता आले नाही. अर्जदार क्र.१ हिच्या बहिणीच्या लग्नावेळी तिला केवळ एक दिवस आणले होते व पुन्हा परत घेवुन गेले. सामनेवाला क्र.४, ५, ९ व १२ ते १४ यांच्या चिथावणी वरुन सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिस मारहण करत असे. तसेच सामनेवाला क्र.२ यांच्या सांगण्यावरुन सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिस माहेरुन ५,००,०००/- आणण्याची मागणी केली होती. त्यावेळी सदर रक्कम तिचे वडील देउ शकत नाहीत

असे तिने सांगितले असता सामनेवाला क्र.१ याने अर्जदारांना घराबाहेर काढुन दिले. त्यावरुन तिने दिनांक १८.०९.२०१८ रोजी पोलिस ठाणे मंगरुळपीर येथे रिपोर्ट दिला. त्यानंतर अर्जदार माहेरी राहत असतांना सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी तिच्या वडिलांना समजावुन व कोणतेही कागदपत्र न करता तिला नांदावयाला नेले. लॉकडाउन मध्ये ती सासरी राहत असतांना तिला जास्त शारीरिक व मानसिक त्रास देउ लागले, ती आजारी असतांना दवाखान्यात नेत नसत, तिच्या अंगावर निंबु पिळवुन वैद्य ाकडे दाखविले. त्या वैद्याने ती तिन दिवसात मरणार आहे असे सांगितले होते. सदर बाबीस अर्जदार क्र.१ हिच्या वडिलांनी विरोध केला व अर्जदार क्र.१ हिस माहेरी आणले होते.

५. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, सामनेवाला क्र.१ हा दुसरा विवाह करणार असल्याची माहिती समजल्यानंतर त्याला समजावण्याकरीता अर्जदार क्र.१ हि तिच्या नातेवाईकांसह गेली असता त्याने मान्य केले नाही व त्यांना धमकी देवुन घराबाहेर काढले. अर्जदारांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. सामनेवाला यांच्याकडे कनका, ता. जि. हिंगोली येथे कसदार १४ एकर शेतजमीन असुन त्यातुन त्यांना वार्षिक १०,००,०००/- रुपये उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाला क्र.१ हा ऑटो चालवितो व त्यातुन त्याला दररोज १,२५०/- रुपये मिळतात. त्याच्यावर अर्जदारांशिवाय कोणीही अवलंबुन नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ हिस दरमहा १५,०००/- व अर्जदार क्र.२ यास दरमहा रक्कम रुपये ७,०००/- पोटगी मिळण्याची, सामनेवाला यांच्या पासुन संरक्षण आदेश मिळण्याची, घ राची व्यवस्था अथवा दरमहा १०,०००/- रुपये घरभाडे मिळण्याची, शारीरिक व मानसिक त्रासापोटी दवाखान्याचा खर्च म्हणुन दरमहा १३,०००/- रुपये मिळण्याची व अर्जदार क्र.२ याच्या शिक्षणाकरीता दरमहा ५,०००/- रुपये मिळण्याची विनंती अर्जदारांनी केली आहे.

**६.** प्रकरणात सामनेवाला क्र.०१ हजर झाला व त्याने निशाणी ७ कडे त्याचा लेखी जबाब दाखल केला. अर्जदारांनी नमुद केलेले नातेसंबंध त्याला मान्य आहेत. अर्जात कथन केलेले इतर आरोप त्याने नाकारले आहेत. त्याच्या कथनानुसार लग्नानंतर त्यांचा संसार दोन वर्ष सुरळीत चालला. दिनांक ३०.०४.२०१७ रोजी अर्जदार क्र.२ याचा जन्म झाला. त्यानंतर आजारी असल्याचे, कामधंदा होत नसल्याचे खोटे कारण सांगुन अर्जदार क्र.१ नेहमी माहेरी जात असे. अर्जदार क्र.१ ही सामनेवाला क्र. १ याच्या वयोवृध्द आई–वडिलांची काळजी घेत नव्हती. अर्जदार क्र.१ ही सामनेवाला क्र.१ यास मानसिक त्रास देत असे, त्याच्या आई–वडिलांना टाकुन बोलत असे, लहान कारणावरुन वाद करत असे. अर्जदार क्र.१ ही हिंगोली येथे राहण्यास जाण्यासाठी सामनेवाला क्र.१ कडे तगादा लावत असे. त्याचे आई–वडील वयोवृध्द असल्यामुळे व त्याला केवळ शेती विषयक कामे येत असल्यामुळे हिंगोली येथे राहण्यास जाणे शक्य नसल्याचे त्याने अर्जदार क्र.१ हिस सांगितले असता त्या कारणावरुन ती भांडण करत असे. तसेच माहेरी नातेवाईकांना फोनद्वारे उलटसुलट बाबी सांगुन सामनेवाला यांच्याविरुध्द भडकावत असे. सामनेवाला क्र.१ याने अर्जदाराच्या नातेवाईकांना तिने व्यवस्थीत नांदावे याकरीता सांगण्याबाबत विनंती केली, परंतु अर्जदार क्र.१ ने त्याच्याकडे दुर्लक्ष केले व सामनेवाला यांच्या विरुध्द महिला दक्षता समिती कडे खोटा अर्ज केला. त्याठिकाणी तडजोड झाल्यानंतर अर्जदार क्र.१ पुन्हा नांदावयास आली, परंतु तिच्या वागण्यात कोणताही फरक पडला नाही. त्यानंतर देखील हिंगोली येथे राहण्यास जाण्याचा तगादा लावत असे व त्या कारणावरुन मानिसक त्रास देत असे.

**७.** त्याचे पुढे असे कथन आहे की, सामनेवाला क्र.१ हा कामानिमित्त बाहेर गेला असता अर्जदार क्र.१ हिने तिच्या अंगावरील सर्व दागिणे, स्त्रीधन घेवुन मुलासह माहेरी गेली. त्यानंतर चार ते पाच दिवसांनी सामनेवाला क्र.१ हा तिला नांदावयास आणण्यास गेला असता तिने

नांदायला येण्यास नकार दिला. तसेच त्याने वेळोवेळी फोनद्वारे अर्जदार क्र. १ हिस नांदावयास येण्याची विनंती केली व नातेवाईकांमार्फत देखील विनंती केली. दिनांक १४.०८.२०२० रोजी सामनेवाला क्र.१ हा त्याच्या नातेवाईकांसह अर्जदार क्र.१ हिस नांदायला आणण्याकरीता तिच्या माहेरी गेला, परंतु तिने येण्यास स्पष्ट नकार दिला. त्यामुळे त्यांने दिवाणी न्यायालय हिंगोली येथे हिंदू विवाह अर्ज क्र.११२/२०२० दाखल केला आहे. कोणत्याही कारणाशिवाय अर्जदार क्र.१ माहेरी राहत आहे. तिने सामनेवाला यांना त्रास देण्याकरीता खोटया कार्यवाहया दाखल केल्या आहेत. सामनेवाला क्र.४ ते ७ हे त्याचे बहिण व जावई असुन ते वेगवेगळया ठिकाणी राहतात. सामनेवाला क्र.९ ते १२ यांचे कुटूंब वेगळे असुन ते आपल्या कुटूंबासह वेगळे राहतात. सामनेवाला क्र.१३ ते १६ हे त्याचे काका, चुलत भाउ, वहिणी असुन ते आपल्या कुटूंबासह वेगळे राहतात. सामनेवाला क्र.१७ ते १९ हे त्याचे मावशी व मावसा असुन ते वेगळया ठिकाणी राहतात. सामनेवाला क्र.२ व ३ हे वयोवृध्द असुन त्यांना वेगवेगळे आजार आहेत.

८. त्याचे पुढे असे कथन आहे की, तो मजुरीचे काम करतो. त्याला प्रत्येक दिवशी मजुरी मिळेल याची शाश्वती नसते. त्याच्या आई-वडिलांच्या वैद्यकीय खर्चाकरीता दरमहा २,०००/- ते ३,०००/- रुपये खर्च येतो. त्याला लहान भाउ असुन त्याच्या शिक्षणाची जबाबदारी त्याच्यावर आहे. अर्जदार क्र.१ हिने केलेल्या वेगवेगळया प्रकरणांमध्ये हजर राहण्याकरीता त्याला प्रत्येक तारखेला २,०००/- रुपये खर्च येतो. त्यामुळे मागणी केल्याप्रमाणे आर्थिक मदत देण्यास तो असमर्थ आहे. याउलट अर्जदार क्र.१ ही तिच्या माहेरी कटलरी दुकान चालविते व त्यातुन तिला दरमहा १५,०००/- ते २०,०००/- रुपये उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्ज खारीज करण्याची विनंती त्याने केली आहे.

९. सामनेवाला क्र.२ ते १९ यांनी निशाणी क्र.१५ कडे पुरर्सिस

दाखल करुन सामनेवाला क्र.१ याने सादर केलेला लेखी जबाब हाच त्यांचा लेखी जबाब समजण्यात यावा असे कळविले आहे.

**१०.** अर्जदारांनी अर्जामधील कथनांच्या पृष्ठयर्थ अर्जदार क्र. ०१ यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.१६ कडे सादर केले. अर्जदारांनी निशाणी ३३ कडील कागदपत्रांच्या यादी सोबत हिंदु विवाह अर्ज क्र. ११२/२०२० यातील रोजनामा व आदेश याची सत्यप्रत आणि नियमीत दिवाणी दावा क्र.२३२/२०२१ यातील रोजनामा व आदेश याची सत्यप्रत सादर केली आहे. अर्जदारांनी निशाणी क्र.२१ कडे पुरसिस सादर करुन त्यांचा पुरावा बंद केला. सामनेवाला यांनी त्यांच्या कथना पृष्ठयर्थ सामनेवाला क्र.१ याचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.२३ कडे सादर केले. उपरोक्त तोंडी पुराव्या व्यतिरिक्त सामनेवाला यांनी त्यांची भिस्त हिंदू विवाह अर्ज क्र.११२/२०२० यातील निशाणी क्र.१ ची प्रत (निशाणी क्र. २८), हिंदू विवाह अर्ज क्र.११२/२०२० यातील कमल २४ अन्वये अर्ज व त्यावरील आदेश (निशाणी क्र.२९), मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील फौजदारी अर्ज. क्र.१४६/२०२१ व फौजदारी अर्ज. क्र. २८/२०२१ यातील एकत्रीत आदेशाची संघणकीय प्रत (आर्टीकल-अ), फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१८३/२०१९ यातील न्यायनिर्णयाची संघणकीय प्रत (आर्टीकल-ब) या कागदोपत्री पुराव्यावर ठेवली आहे. सामनेवाला यांनी निशाणी क्र.३० कडे पुरसिस सादर करुन त्यांचा पुरावा बंद केला. अर्जदार क्र.१ हिने निशाणी क्र.१७ कडे व सामनेवाला क्र.१ याने निशाणी क्र.२० कडे त्यांचे मालमत्ता व दायित्व प्रमाणपत्र सादर केले आहे.

**११.** अर्जदार व सामनेवाला यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**१२.** अर्जदार व सामनेवाला यांचे कथन, उभयंतांचा आलेला पुरावा, त्यांच्या वकिलांनी केलेला युक्तीवाद विचारात घेता सदरहु प्रकरणात खालील प्रमाणे मुद्दे विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते. त्यावरील माझे निष्कर्ष व

कारणमिमांसा खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | सामनेवाला यांनी अर्जदारांसोबत कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अर्जदार शाबित करतात काय? | नाही. |
| २) | अर्जदार हे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १८ प्रमाणे संरक्षण आदेशासाठी पात्र आहेत काय ? | नाही. |
| ३) | अर्जदार हे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १९ प्रमाणे स्वतंत्र निवासाची व्यवस्था अथवा घरभाडे मिळण्यास पात्र आहेत काय ? | नाही. |
| ४) | अर्जदार हे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २० प्रमाणे आर्थिक सहाय्याचे आदेशासाठी पात्र आहेत काय? | नाही. |
| ५) | अर्जदार हे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २२ प्रमाणे नुकसान भरपाई आदेशासाठी पात्र आहेत काय ? | नाही. |
| ६) | प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? असल्यास आदेश रक्कम काय ? | अर्ज नामंजुर करण्यात येतो. |

## : का र ण मि मां सा :

**मुद्दा क्र.०१ बाबत.** :-

**१३.** कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम अन्वये

सामनेवाला यांचे कोणतेही कृत्य, अकृत्य, वर्तन किंवा कृती ही कौटूंबिक हिंसा ठरते, जर ते -

१. महिलेच्या शारीरिक किंवा मानसिक आरोग्यास, सुरक्षिततेस, जिवनास किंवा कल्याणास ईजा पोहचवत असेल किंवा धोका निर्माण करत असेल, ज्यामध्ये शारीरिक, लैंगिक, शाब्दीक, भावनीक आणि आर्थिक अत्याचाराचा समावेश होतो, किंवा
२. हूंडा किंवा इतर मालमत्ता अथवा मौल्यवान सुरक्षा मिळवण्यासाठी बेकायदेशीर मागणी पुर्ण करण्याच्या उददेशाने महिलेचा छळ किंवा त्रास करत असेल, किंवा
३. वरील प्रकारच्या वर्तनाद्वारे महिलेस किंवा तिच्या नातेवाईकांना धमकी देत असेल किंवा
४. इतर कोणत्याही प्रकारे महिलेस शारीरीक किंवा मानसिक ईजा अथवा हानी पोहचवत असेल.

**१४.** अर्जदार व सामनेवाला यांच्या तर्फे आलेल्या पुराव्यावरुन खालील बाबी विवादीत नाहीत.

१. अर्जदार क.१ व सामनेवाला क.१ हे पती-पत्नी असुन अर्जदार क.२ हा त्यांचा मुलगा आहे.
२. सामनेवाला क.२ व ३ हे सामनेवाला क.१ याचे वडील व आई आहेत.
३. सामनेवाला क.४ व ६ या सामनेवाला क.१ याच्या बहिणी असुन सामनेवाला क.५ व ७ हे बहिणीचे पती आहेत.
४. सामनेवाला क.८ हा सामनेवाला क.१ याचा भाउ आहे.
५. सामनेवाला क.९ ते १९ हे सामनेवाला क.१ याचे नातेवाईक आहेत.

**१५.** अर्जदार क्र.१ हिने तिच्या पुराव्याच्या शपथपत्रात अर्जातील कथनांचा पुर्नरोच्चार केलेला आहे. तिचे पुराव्याचे शपथपत्र हे तिच्या अर्जाची प्रतिकृती आहे. सामनेवाला क्र.१ याने दिवाणी न्यायालय व.स्तर हिंगोली येथे तिने नांदावयास येण्यासाठी हिंदू विवाह अर्ज क्र.११२/२०२० हे प्रकरण दाखल केल्याचे तिने उलटतपासात मान्य केले आहे. तसेच त्या प्रकरणात तिला दरमहा रक्कम रुपये १,०००/- खावटी देण्याचा आदेश सामनेवाला क्र.१ याचे विरुध्द दिनांक २५.०२.२०२२ रोजी झालेला असल्याचे ती मान्य करते. त्याचप्रमाणे त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १२५ अन्वये पोटगी मिळण्याकरीता प्रकरण दाखल केले होते व त्यामध्ये तिला दरमहा १,५००/- रुपये व अर्जदार क्र.२ यास दरमहा १,०००/- रुपये पोटगी मंजुर झाली असल्याचे देखील तिने मान्य केले आहे. सामनेवाला क्र.१ सोबत सासरी राहत असतांना तब्बेतीचे कारण सांगुन ती नेहमी माहेरी राहत असल्याचे, पुढे वाद करणार नाही व व्यवस्थीत नांदेल असे दक्षता समिती कार्यालया पुढे तिने सांगितल्याचे देखील ती मान्य करते.

**१६.** सामनेवाला क्र.१ याने त्याच्या पुराव्याच्या शपथपत्रात त्याच्या लेखी जबाबातील कथनांचा पुर्नरोच्चार केलेला आहे. त्याच्या उलटतपासामध्ये त्याच्या लेखी जबाबातील कथना विपरीत कोणतेही कथन आलेले नाही.

**१७.** प्रस्तुत अर्ज हा एकुण १९ लोकांविरुध्द दाखल केलेला आहे. यापूर्वीच नमुद केल्याप्रमाणे सामनेवाला क्र.४ व ६ या सामनेवाला क्र. १ याच्या बहिणी असुन सामनेवाला क्र.५ व ७ हे त्यांचे पती आहेत. सामनेवाला क्र.४ ते ७ यांचा विवाह तिच्या विवाहापुर्वीच झाला असल्याचे व ते वेगळया घरात राहत असल्याचे अर्जदार क्र.१ हिने उलटतपासात मान्य केलेले आहे. सामनेवाला क्र.८ ते १९ हे सामनेवाला क्र.१ याचे नातेवाईक असले तरी अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांच्या सोबत ते कधीही एकत्र

कुटूंबात राहत नव्हते ही बाब देखील अर्जदार क्र.१ यांच्या उलटतपासातुन दिसून येते. याचाच अर्थ, केवळ सामनेवाला क्र.१ याचे नातेवाईक असल्यामुळे त्यांना प्रस्तुत प्रकरणात पक्षकार म्हणुन समाविष्ट करण्यात आल्याचे दिसून येते. सामनेवाला क्र.४ ते १९ हे कधीही अर्जदार क्र.१ सोबत एकत्र राहण्यास नसल्यामुळे निश्चितच कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम अन्वये सामनेवाला या सदरात ते येउ शकत नाहीत.

**१८.** त्याचप्रमाणे सामनेवाला क्र.१ याचा दुसरा विवाह करुन देण्याची सामनेवाला क्र.४ ते १९ हे चिथावणी देत असल्याबाबत अर्जदाराचे कथन असले तरी तशा कथना पृष्ठयर्थ कोणताही ठोस पुरावा अर्जदारांतर्फे आलेला नाही. सामनेवाला क्र.४ ते १९ यांनी सामनेवाला क्र.१ याच्या दुस-या विवाहासाठी कोणत्या मुली दाखवल्या, याबाबत कोणतेही स्पष्ट कथन देखील करण्यात आलेले नाही. अशा परिस्थीतीत, सामनेवाला क्र.४ ते १९ यांनी अर्जदार क्र.१ हिच्यावर कौटूंबिक हिंसा केली हे सिध्द होत नाही.

**१९.** लग्नामध्ये तिच्या वडिलांनी सोन्या चांदीचे दागिणे व इतर वस्तु दिल्याचे अर्जदार क्र.१ हिने पुराव्याच्या शपथपत्रात कथन केले असले तरी सदरचे दागिणे व वस्तु सामनेवाला क्र.१ अथवा इतर सामनेवाला यांनी विक्री केल्या अथवा तिच्या कडुन जबरदस्तीने घेतल्या असे कोणतेही कथन तिने केलेले नाही. तिला मुलबाळ होत नसल्याच्या कारणावरुन सामनेवाला क्र.१ ते ५ व ८ हे तिला त्रास देत असत असे अर्जदार क्र.१ ने तिच्या पुराव्याच्या शपथपत्रात केलेले कथन विश्वासनीय नाही. याठिकाणी नमुद करावे लागेल की, अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दिनांक ०६.०५.२०१५ रोजी झालेला आहे. अर्जदार क्र.२ याचा जन्म दिनांक ३०. ०४.२०१७ रोजी झाला असल्याचे कथन सामनेवाला क्र.१ याने त्याच्या लेखी जबाबत केलेले आहे. लग्नानंतर दोन वर्षाच्या आत अर्जदार क्र.

२ याचा जन्म झालेला असतांना मुल होत नाही या कारणावरुन सामनेवाला क्र.१ ते ५ व ८ हे तिला त्रास देत होते असे अर्जदारांचे कथन विश्वसनीय नाही.

२०. सामनेवाला क्र.७ हा मध्यप्रदेश राज्यात राहतो व सामनेवाला क्र.८ हा सामनेवाला क्र.१ याचा भाउ असला तरी वेगळया घरात राहतो ही बाब आलेल्या पुराव्यावरुन स्पष्ट आहे. त्यामुळे सामनेवाला क्र.७ व ८ हे तिच्याकडे वाईट व अश्लिल नजरेने पाहत असत हे अर्जदार क्र.१ हिने पुराव्यात केलेले कथन मानता येणार नाही. सामनेवाला यांनी तिला शारीरिक अथवा मानसिक त्रास दिल्याबाबतच्या कोणत्याही स्पष्ट घटना अर्जदार क्र.१ हिने पुराव्यात कथन केलेले नाहीत. त्या घटनांच्या तारखा देखील नमुद करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे अर्जदारांनी अर्जामध्ये व पुराव्यामध्ये मोघम स्वरुपाचे कथन केले असल्याचे दिसून येते.

२१. सामनेवाला क्र.१ ते ५ व ८ यांनी तिला शेताची पेरणी करण्याकरीता माहेरुन रक्कम रुपये ३०,०००/- आणण्याची मागणी केली होती व त्यावेळी तिच्या वडिलांनी तिच्या समक्ष सामनेवाला यांना रक्कम रुपये ३०,०००/- दिले होते असे अर्जदार क्र.१ हिने पुराव्यात कथन केले असले तरी सदर रकमेची मागणी कधी केली, रक्कम कधी देण्यात आली याबाबत कोणतेही विवेचन करण्यात आले नाही. सदरची रक्कम तिच्या वडिलांनी दिली होती ही बाब सिध्द करण्यासाठी तिच्या वडिलांना साक्षीदार म्हणुन तपासण्यात आलेले नाही. केवळ मोघम कथन केल्यावरुन आणि कोणत्याही स्पष्ट पुराव्याशिवाय अर्जदारांचे सदरचे कथन ग्राहय धरता येणार नाही.

२२. सामनेवाला यांनी तिला माहेरुन रक्कम रुपये ५,००,०००/- आणण्याच्या मागणीसाठी घरातुन हाकलुन दिल्याचे व त्यानंतर दिनांक १८.

०९.२०१८ रोजी तिने पोलिस ठाणे मंगरुळपीर येथे रिपोर्ट दिल्याचे अर्जदार क्र.१ हिने पुराव्याच्या शपथपत्रात कथन केले आहे. सामनेवाला यांनी सदरची मागणी कधी केली याबाबत कोणतेही कथन करण्यात आलेले नाही. तशा कथनाबाबत कोणताही स्वतंत्र साक्षीदार देखील अर्जदारांतर्फे तपासण्यात आलेला नाही. याठिकाणी नमुद करण्यासारखी बाब म्हणजे अर्जदार क्र.१ हिने दिनांक १८.०९.२०१८ रोजी दिलेला पोलिस ठाणे मंगरुळपीर येथील रिपोर्ट रदद करण्याकरीता सामनेवाला यांनी मा.उच्च न्यायालयात फौजदारी अर्ज क्र.१४६/२०२१ व फौजदारी अर्ज क्र.२८/२०२१ दाखल केल्याचे आणि सदर दोन्ही अर्ज मा.मुंबई उच्च न्यायालयाने मंजुर करुन पोलिस ठाणे मंगरुळपीर येथे नोंद अपराध क्र.११३२/२०२० रदद केल्याचे दिसून येते. सदर आदेशाची संगणकीय प्रत सामनेवाला यांनी दाखल केली. सदर आदेशाबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावरुन सदर आदेशाची खात्री करण्यात आली.

**२३.** ती माहेरी राहत असतांना सामनेवाला क्र.१ ते ३ तिच्या माहेरी आले व तिच्या वडिलांची समजुत घालुन तिला नांदावयास नेले आणि त्यावेळी लॉकडाउन सुरु असल्यामुळे ती ६ महिने सासरी राहीली व दिनांक २०.०३.२०२० रोजी ती आजारी असतांना तिला दवाखान्यात न नेता जादूटोना करणा-या वैद्याकडे नेले असे अर्जदार क्र.१ हिने पुराव्यात कथन केलेले आहे. सदरची बाब सामनेवाला यांनी नाकारलेली आहे. याउलट सामनेवाला क्र.१ याचा अर्जदारांतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात आपसी समजोता न करता पोलिस ठाण्यातुन अर्जदार क्र.१ हिस नांदावयास घेवुन गेल्याबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी अर्जदार क्र.१ त्याच्यासोबत नांदावयास आली होती असे सामनेवाला क्र.१ याने उलटतपासात सांगितले असले तरी त्यावेळी कोरोना काळ नव्हता असे स्पष्ट तो सांगतो.

**२४.** कोरोना काळात अर्जदार क्र.१ ही नांदावयास गेली होती असे

तिचे कथन विश्वासहार्य वाटत नाही, कारण फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १८३/२०१९ हा दिनांक २२.०८.२०१९ रोजी अर्जदारांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १२५ अन्वये दाखल केल्याचे दिसून येते. कोरोना काळ हा मार्च, २०२० पासुन सुरु झाला. सदर कालावधीत अर्जदार क्र.१ ही नांदावयास गेली असती तर निश्चितच फौ.प्र.सं.चे कलम १२५ अन्वये दाखल केलेले प्रकरण काढले असते अथवा त्यामध्ये तडजोड करण्यात आली असती. तसेच अर्जदार क्र.१ हिने नांदावयास यावे याकरीता सामनेवाला क्र.१ यांनी दिवाणी न्यायालय व.स्तर हिंगोली येथे हिंदू विवाह अर्ज क्र. ११२/२०२० दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज हा दिनांक २६.११.२०२० रोजी दाखल केल्याचे व त्या प्रकरणामध्ये दिनांक २८.०९.२०२१ रोजी अर्जदार क्र.१ हिने हिंदू विवाह कायदयाचे कलम २४ अन्वये अर्ज केल्याचे दिसून येतो. त्या अर्जामध्ये कोरोना काळात ती सामनेवाला क्र. १ याच्यासोबत नांदावयास गेल्याचे व तेथे नांदत असतांना दिनांक २०.०३. २०२० रोजी आजारी असतांना तिला जादूटोना केल्याचे तिने नक्कीच त्या अर्जामध्ये नमुद केले असते, परंतु तसे कोणतेही कथन सदर अर्जात तिने केलेले नाही. अशा परिस्थीतीत कोरोना काळापूर्वी अथवा कोरोना काळात ती नांदावयास गेल्याचे, त्यावेळी तिचा शारीरिक व मानसिक छळ झाल्याचे अर्जदार क्र.१ हिचे कथन मानता येणार नाही.

**२५.** सामनेवाला क्र.३ ही सामनेवाला क्र.१, ४, ६ व ८ यांची आई आहे. प्रस्तुत अर्जामध्ये सामनेवाला क्र.३ हिचे वय ४५ वर्ष व सामनेवाला क्र.४ हिचे वय ३५ वर्ष दर्शविलेले आहे. सामनेवाला क्र.४ ही सामनेवाला क्र.३ यांची मुलगी असतांना त्यांच्या वयामध्ये निश्चितच ऐवढे कमी अंतर असु शकणार नाही. त्याचप्रमाणे प्रस्तुत अर्जात अर्जदार क्र.२ याचे वय ३ वर्ष दर्शविलेले आहे. सन २०१९ मध्ये दाखल केलेल्या फौ.प्र.स.च्या कलम १२५ अन्वये अर्जामध्ये देखील अर्जदार क्र.२ याचे वय ३ वर्ष दर्शविलेले आहे. यावरुन अर्जदारांनी सत्य परिस्थीती न्यायालयासमोर न आणता केवळ

मोघम आरोप केल्याचे दिसून येते.

२६. विशेष नमुद करण्यासारखी बाब म्हणजे ती सासरी नांदत असतांना तब्बेतीचे कारण सांगुन नेहमी माहेरी जात असल्याची बाब अर्जदार क्र.१ हिने उलटतपासात मान्य केली आहे. यावरुन अर्जदार ही नेहमी आजारी असल्याचे खोटे कारण सांगुन माहेरी जात असे या सामनेवाला यांच्या कथनास दुजोरा मिळतो.

२७. कोणतीही विवाहीत स्त्री तिला अपत्य असतांना तिचे पती व नातेवाईक त्रास देतात या कारणावरुन कायमस्वरुपी माहेरी राहणार नाही. तिला तिच्या पतीने नांदावयास न्यावे याकरीता ती स्त्री व तिचे नातेवाईक निश्चितच प्रयत्न करतील. सामनेवाला यांनी तिला घरातुन हाकलुन दिल्यानंतर तिला पुन्हा नांदविण्यासाठी तिने अथवा तिच्या नातेवाईकांनी कोणतेही प्रयत्न केल्याचे अर्जदार क्र.१ हिने पुराव्यात अथवा अर्जामध्ये कथन केलेले नाही. तसेच तिला नांदावयास न्यावे याकरीता तिने कोणतीही कार्यवाही दाखल केली नाही अथवा कोणतीही नोटीस पाठविली नाही. याउलट अर्जदार क्र.१ हिने नांदावयास यावे याकरीता सामनेवाला क्र. १ याने न्यायालयात प्रकरण दाखल केल्याचे दिसून येते. तसेच त्याने वेळोवेळी फोनद्वारे व नातेवाईकांमार्फत अर्जदाराने नांदावयास यावे याकरीता प्रयत्न केल्याचे लेखी जबाबामध्ये व पुराव्याच्या शपथपत्रात स्पष्ट कथन केलेले आहे. दिनांक १४.०८.२०२० रोजी सामनेवाला क्र.१ हा तिला नांदावयास नेण्याकरीता तिच्या माहेरी आला होता, परंतु ती गेली नाही असे अर्जदार क्र.१ हिने नाकारले असले तरी त्याच कारणास्तव सामनेवाला क्र.१ याने हिंगोली येथील न्यायालयात नांदावयास येण्याबाबतचे प्रकरण दाखल केल्याचे ती मान्य करते. यावरुनच अर्जदार क्र.१ हिने नांदावयास यावे याकरीता सामनेवाला क्र.१ याने प्रयत्न केल्याचे व तो तिला नांदविण्यास तयार असल्याचे दिसून येते.

**२८.** एकंदरीत आलेल्या पुराव्यावरुन अर्जदारांनी अर्जामध्ये केवळ मोघम कथन करुन प्रकरण दाखल केल्याचे दिसून येते. सामनेवाला यांनी तिच्यावर कौटूंबिक हिंसा केल्याबाबत कोणताही पुरावा आलेला नाही. त्यामुळे अर्जदार क्र.१ वर कौटूंबिक हिंसा झाल्याचे सिध्द होत नाही. करीता मुददा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

## मुददा क्र.२ करीता

**२९.** महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम याचा उद्देश विचारात घेता व आलेला पुरावा विचारात घेता सामनेवाला यांनी अर्जदारांवर कौटूंबिक हिंसा केल्याचे शाबीत होत नाही. त्याच प्रमाणे अर्जदार क्र.१ व सामनेवाला हे वेगवेगळे राहत असतांना सामनेवाला यांनी ती राहत असलेल्या ठिकाणी जावुन तिला शारीरिक अथवा मानसीक त्रास दिल्याचे अर्जदारांचे कोणतेही कथन नाही. त्यामुळे अर्जदार संरक्षण आदेश मिळण्यास पात्र ठरत नाही. करीता मुददा क्र.२ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

## मुददा क्र.३ ते ५ करीता

**३०.** सामनेवाला यांनी अर्जदारांवर कौटूंबिक हिंसा केल्याचे शाबीत झालेले नाही. त्याच कारणावरुन अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे पोटगी, राहण्याची स्वतंत्र व्यवस्था अथवा घरभाडे, शारीरिक व मानसिक त्रासापोटी मदत मिळण्यास पात्र ठरत नाहीत.

**३१.** तसेच नमुद करावे लागेल की, सामनेवाला क्र.१ याच्याकडे १४ एकर शेतजमीन असल्याचे अर्जदारांचे कथन असले तरी त्याबाबतचा कोणताही पुरावा दाखल करण्यात आलेला नाही. केवळ तोंडी कथन केल्यावरुन सामनेवाला क्र.१ याच्याकडे १४ एकर शेती असल्याचे मानता येणार नाही. सामनेवाला क्र.१ हा ऑटो चालवुन त्यातुन त्याला दररोज १,२५०/- रुपये मिळतात, असे कथन असले तरी त्याच्याकडे

असलेल्या ऑटोचे कागदपत्र, त्याचा वाहन चालविण्याचा परवाना इत्यादी दाखल करण्यात आलेले नाहीत. सदरची बाब सामनेवाला क्र.१ याने नाकारलेली आहे. त्यामुळे सामनेवाला क्र.१ याच्याकडे ऑटो असुन त्यातुन त्याला दररोज १,२५०/- रुपये उत्पन्न मिळते असे मानता येणार नाही. अर्जाच्या पुर्ततिकरीता सदर बाबी नमुद केल्याचे नाकारता येणार नाही.

**३२.** याउलट फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १२५ अन्वये दाखल केलेल्या अर्जामध्ये न्यायनिर्णय होवुन अर्जदारांना सामनेवाला क्र. १ याच्याकडुन दरमहा २,५००/- रुपये पोटगी मंजुर झालेली आहे. त्याचप्रमाणे हिंदू विवाह अर्ज क्र.११२/२०२० यामध्ये हिंदू विवाह कायदयाचे कलम २४ अन्वये अर्जदार क्र.१ यांचा अर्ज मंजुर करण्यात आला असुन सामनेवाला क्र.१ यांनी दरमहा १,०००/- रुपये अर्जदार क्र.१ हिस दयावेत असे आदेशीत करण्यात आले आहे. सामनेवाला क्र.१ यास शेतमजुरी शिवाय उत्पन्नाचे इतर कोणतेही साधन असल्याचे अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन दिसुन येत नाही. सामनेवाला क्र.२ व ३ हे सामनेवाला क्र. १ याचे आई-वडील असुन त्यांचा सांभाळ करण्याची जबाबदारी काही प्रमाणात त्याच्यावर निश्चितच आहे. त्यामुळे सामनेवाला क्र.१ याचे उत्पन्न, त्याच्यावर असलेल्या जबाबदा-या, अर्जदारांना इतर प्रकरणात मंजुर झालेली पोटगी या कारणावरुन अर्जदार हे अतिरिक्त पोटगीसाठी अथवा इतर मागण्यासाठी पात्र ठरत नाहीत. करीता मुददा क्र.३ ते ५ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुददा क्र.६ करीता</u>**

**३३.** मुद्दा क्र.०१ ते ०५ वरील निष्कर्षावरुन अर्ज नामंजुर करण्याच्या योग्यतेचा आहे. अर्जदार व सामनेवाला यांच्यातील नातेसंबंध विचारात घेता खर्चाबाबत कोणताही आदेश करणे उचित होणार नाही. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

: **आ दे श** :

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत अर्जदारास मोफत पुरविण्यात यावी.

*न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.*

SUBHASH DATTARAO TARE

Digitally signed by SUBHASH DATTARAO TARE
Date: 2026.07.30 13:53:28 +0530

दिनांक ३०/०७/२०२६ (सुभाष द. तारे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरुळपीर

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | |
|---|---|
| Name of Court | 2nd Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Mangrulpir, Dist. Washim. |
| Presiding Officer | Subhash D. Tare |
| Judgment uploaded by | N.F.Syed (Stenographer-III) |
| Date of Judgment | 30.07.2026 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | 30.07.2026 |
| Judgment/Order uploaded on | 30.07.2026 |